# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

विषय: बँकेच्या ७४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी महानगरपालिका कर्मचारी जे बँकेचे सभासद आहेत त्यांना कामकाजाच्या वेळेत सभेस उपस्थित राहण्यास सवलत मिळण्याबाबत.

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, यांची चौऱ्याहत्तरावी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, दि. ३१ ऑगस्ट, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता श्री शिवाजी मंदिर, न.चिं.केळकर पथ, दादर (प), मुंबई - ४०००२८ येथे आयोजित करण्यात आली आहे.

महाव्यवस्थापक, दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई यांच्या दि. ०१ ऑगस्ट, २०२६ च्या पत्राच्या अनुषंगाने जे महानगरपालिका कर्मचारी सदर बँकेचे सभासद आहेत अशा महानगरपालिका कर्मचाऱ्यांना बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी सोमवार, दि. ३१ ऑगस्ट, २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता कार्यालय सोडण्यास मान. महानगरपालिका आयुक्त यांनी क्र.एमजीसी /एफ/१६९३ दि.१८.०८.२०२६ अन्वये मंजूरी दिली आहे.

तद्अनुषंगाने बँकेच्या सभासद असणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच, सोमवार, दि. ३१ ऑगस्ट, २०२६ रोजी श्री शिवाजी मंदिर, न.चिं.केळकर पथ, दादर (प), मुंबई - ४०००२८ येथे होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी दुपारी ३.०० वाजता कार्यालय सोडण्याची सवलत देण्यात येत आहे.

सदर परिपत्रक http://portal.mcgm.gov.in आणि http://mybmcemp.mcgm.gov.in/circulars या संकेतस्थळांवर उपलब्ध करण्यात येत आहे.

सही/- २४.०८.२०२६

(श्रीम. सुरेखा सु. घाडगे)
प्रमुख कर्मचारी अधिकारी

सही/- २४.०८.२०२६

(श्री. किशोर गांधी)
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
क्र.प्रकअ/२५८/सर्वसा(एमओपी/९२०)
दि. २४.०८.२०२६

प्रत------------------------------------------------------ यांना (--------जादा प्रतींसह)
माहितीकरिता व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

24.08.2026

(श्रीम. कल्याणी स. नाईक)
प्रशासकीय अधिकारी (आयुक्त)
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय

24/08/2026